IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# भारतीय छापा कलेचे बदलते स्वरूप यावर अभ्यास

**डॉ. सचिन रामरावजी हजारे**

पी.आर. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अमरावती

## सारांश

प्रत्येकच कला काळानुसार जागतिक पातळीवर सर्वच ठिकाणी सतत बदलत गेलेली आहे. कालखंडानुसार समाज रचनेत झालेल्या बदलांचा,वातावरणाचा कलेवर प्रभाव पडताना दिसून येते. काळानुसार इतर क्षेत्रात लागणाऱ्या शोधाचा सुद्धा कलेवर प्रभाव पडत आला आहे. महत्त्वाचे म्हणजे इतर कला प्रकाराप्रमाणेच भारतीय मुद्रण कला क्षेत्रात सुद्धा,पारंपारिक पद्धती पासून सुरू झालेला मुद्रण कलेचा प्रवास आज आधुनिक मुद्रणकला निर्मितीच्या उच्चांकावर पोहचला आहे,पारंपारिक मुद्रणकलेची बंधने झुगारून अगदी तरुण कलाकार अपारंपारिक माध्यमाचा वापर छापा चित्रनिर्मिती करण्याकरिता करीत असल्याचे दिसत आहेत. अशाच अपारंपारिक माध्यमांचा वापर छापा चित्रे निर्माण करण्याकरिता करीत असणाऱ्या भारतीय छापा चित्रकारांचा व त्यांच्या कार्यपद्धतीचा येथे अभ्यास करण्यात आलेला आहे बऱ्याच वेळा अशा अपारंपारिक माध्यमात काम करीत असणाऱ्या छापा चित्रकारांच्या अविष्कृत कलेला छापा कलेचाच एक प्रकार म्हणून पूर्ण पणे स्वीकारल्या पण जात नाही. ही गोष्ट जरी खरी असली,तरी बुद्धीजीवी वर्गाला या संदर्भात विचार करायला मात्र त्यांनी भाग पाडले आहे,हे तेवढेच खरे आहे! छापा कलेचे भविष्य हेच असेलयाची संभावना नक्कीच नाकारता येणार नाही.

**Key Words:-**Printmaking, Innovative experiments, unconventional printmaking

## प्रस्तावना

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. तोच नियम भारतीय कला जगतला सुद्धा लागू होतो. काळानुसार भारतीय कला सुध्दा सतत बदलत गेली आहे. आज २१ व्या शतकात छापा कला सुध्दा टप्प्याटप्प्याने हा लांब प्रवास पूर्ण करीत तिच्या आजच्या स्वरुपात आपल्या समक्ष उभी आहे.

भारतीय छापा चित्रणाच्या भविष्याच्या दृष्टीने सुरुवातीपासून काही छापा चित्रकार प्रयत्नशील राहिले आहे. जे सतत प्रयोगात्मक काम करीत आले आहेत त्यामध्ये प्रामुख्याने कृष्णा रेड्डी, सोमनाथ होर, ज्योतिंद्र मनशंकर भट्ट, सनत कर, जगमोहन चोपडा, अनुपम सुद, लक्ष्मा गौड यांचा समावेश आहे. तर मधल्या दोन दशकात सुद्धा पहिल्या छापा कलाकारांच्या पिढी पासून प्रेरणा घेऊन दत्तात्रे आपटे, झरीना हाश्मी, रविकुमार काशी, अर्चना हांडे,रियाज कोमू,अनुपम चक्रवर्ती सारख्या कलाकारांनी सुद्धा आपली स्वतंत्र शैली तयार करण्यामध्ये यश मिळवले. असाच एक छापा चित्रकार ज्याने अनेक अपारंपारिक मध्यमाचा वापर करून छापा चित्रे निर्माण केली आहे. तो म्हणजे आर. एम. पलानी अप्पन हे असेछापाचित्रकार आहेत ज्यांनी कोणतेही तंत्र व माध्यमछापाचित्रे निर्माण करण्याकरिता वापरतांना मागे पुढे पाहिले नाही. तर त्यांनी केवळ आपल्या भावना व कल्पना मांडण्याकरिता विविध मध्यमाचा वापर केला आहे. तर ए.बाल.सुब्रमण्यम सारखा कलाकार डिजिटल कॅमेरा, जळता कोळसा, पी. ओ. पी. मोल्ड सारख्या बऱ्याच अपारंपारिक माध्यमाचा वापर छापा चित्रे निर्मिती करिता करतो. बैजू पार्थन हा वेगवेगळ्या सॉफ्टवेअरचा वापर करून स्वतःचे आकार निर्माण करतो व त्याचे डिजिटल माध्यमात प्रिंट काढतो.

पॉला सेन गुप्ता ही अशी प्रिंट मेकर आहे जिच्या आज निर्माण करण्यात येणाऱ्या सगळ्याच कला कृतीना छापा चित्रे म्हणून संबोधने योग्य नाही परंतु तिच्या प्रत्येक कला निर्मिती मध्ये तिचे छापा चित्रकार असण्याचे प्रतिबिंब मात्र नक्की दिसते ज्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आज काही तरुण कलाकार पारंपारिक छापा पद्धतींना सन्मान देत अपारंपारिक पद्धतींचा वापर छापा चित्र निर्मिती करिता करीत आहे. त्यांच्या ह्या प्रेयत्नांना जुजोरा देण्याचा प्रयत्न मी या शोध निबंधात केला आहे. ज्यामध्ये अशा तरुण छापाचित्रकारांचा समावेश केला आहे ज्यांनी पारंपारिक पद्धतीने छापा चित्रे निर्माण

करण्याशिवाय काही नवीन पद्धती अवलंबून नव्या संकल्पनेतून मुद्राचित्रे निर्माण केली आहे. ज्यामध्ये त्यांनी पेपर पल, डिजिटल माध्यमांचा वापर नव्याने करून, इन्स्टॉलेशन, व्हिडिओ ऑडीओ आर्ट, ३D प्रिंटींग, स्कल्पचर, नैसर्गिक ऊर्जा अशा अपारंपारिक माध्यमांचा वापर करूनछापा कला ह्या संकल्पनेच्या साच्यात बसेल अशा काही कलानिर्मिती केल्या आहे.

**तरुण छापा कलाकारांचा अभ्यास**

आज भारतात असेही कलाकार आहेत,ज्यांनी नुकतेच आपले मुद्रणकलेचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर,या विषयांमध्ये अनेक प्रयोगात्मक मुद्राचित्रे तयार करण्याकरिता सुरुवात केली आहे. त्यामध्ये पुढील काही तरुण कलाकारांचा उल्लेख प्रामुख्याने करता येईल.

सचिन बोंडे हा तरून कलाकार आहे. जो केवळ पारंपारिक प्रिन्ट माध्यमात काम न करता प्रिन्टमेकिंगची एक नवीन भाषा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. सचिन चा जन्म १९८५ मध्ये महाराष्ट्र येथील यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा या छोट्याशा गावी झाला. शालेय शिक्षण त्याने दारव्हावरूनच पूर्ण केले व प्राथमिक कलाशिक्षण नागपूर येथील शरद पवार चित्रकला महाविद्यालया मधून घेतले. त्यानंतर त्याने २०१३ मध्ये पेंटिंग विषयातून पदवी आणि पदवी उत्तर पदवी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथून २०१५ मध्ये प्रिन्टमेकिंग विषयातून पूर्ण केले. २०११– २०१२ च्या दरम्यान सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट ची फेलोशिप सुद्धा त्यांनी मिळवली. प्रोफेशनल करिअरची सुरुवात मुंबईतील 'क्लर्क हाऊस इन्स्टिट्यूट आर्ट स्पेस' येथे असिस्टंट क्युरेटर आणि एक्झिबिशन डिझायनर म्हणून केली. सोबतच तो 'शून्य कलेक्टिव' या सात कलाकाराच्या ग्रुपचा सदस्य सुद्धा आहे. त्याने आजवर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक एकल आणि ग्रुप प्रदर्शनी मध्ये सहभाग घेतलेला आहे. बॉम्बे आर्ट सोसायटी मुंबई, महाराष्ट्र स्टेट आर्ट अवॉर्ड, फ्युचर आर्ट फाउंडेशन स्विझर्लंड सारखे अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पुरस्कार आजवर प्राप्त केले आहे.

सचिनच्या मते "मनुष्य सतत निसर्ग व प्राण्यापासून प्रेरणा घेऊन या ग्रहावरील सर्वात मजबूत प्रजाती म्हणून टिकून राहण्यासाठी प्रयत्नशील असतो. याकरिता तंत्रज्ञान व विज्ञानांमध्ये अनेक संशोधन तो करीत आलेला आहे" याच आधारावर आर्थिक आणि जागतिकीकरण विषयाला घेऊन तो काम करतो शहरी जीवनशैलीचा ग्रामीण जीवनावर कसा प्रभाव पडत आहे. त्याचबरोबर सामाजिक राजकीय विषयाला घेऊन तो आपल्या कलेमध्ये भाष्य करतो. या करीता बहुतेक वेळी तो मनुष्य, प्राणी व वेगवेगळया युनिव्हर्सल वस्तूंचा वापर आपल्या कामात करतो. जवळजवळ मागील सहा वर्षापेक्षा अधिक काळापासून सचिन तेल राजकारण, तेल युद्ध, तेल म्हणून इंधन या आधारित विषयाला घेऊन तो काम करीत आला आहे. तो प्रिन्ट माध्यमात कामकरतांना केवळ पारंपारिक माध्यमात केलेल्या प्रिन्ट भित्तीनवर लावत नाही तर त्या सोबत इन्स्टॉलेशन सुध्दा तो करतो. या संबंधित काही उदाहरणे पुढील प्रमाणे देता येतील त्याच्या मुकुट (Crown) ह्या प्रिन्ट इन्स्टॉलेशन चित्रात तो ऐचिंग ह्या पारंपारिक माध्यमात केलेल्या प्रिन्ट चित्रासोबत एक खेर क्राऊन पण ठेवले आहे त्या क्राऊनच्या वरच्या बाजूला एक टेंबा लावला आहे व त्या टेंब्यावर आम्लद्रव्यांचा वापर करून काही



*मुकुट (Crown) ह्याप्रिन्टइन्स्टॉलेशन, सचिन बोंडे*

आकार तो कोरतो. या पध्दतीत त्याने बरेच कामे केले आहे. त्याच्या या कामाबद्दल बोलताना तो सागतो की "बऱ्याच वेळा मी माझे प्रिन्ट माध्यमात केलेले जुने कामे बघतो तेव्हा मला ते आज अपूर्ण असल्याचा भास देतात अशावेळी मी त्या सोबत अशा काही वस्तू डिस्प्ले करतो ज्यामुळे माझ्या जुन्याकामाना एक नवीन अर्थ मिळतो व मला माझे प्रिन्ट चित्रे पूर्णतेचा आभास देतात." दुसरीकडे प्रिन्टमेकिंग ची एका नवीन भाषा अंतर्गत पी. ओ. पी. (POP) ह्या माध्यमाचा वापर करीत एका सारख्या अनेक वस्तू तो तयार करतो व त्यासोबत तो धातूपत्रे, वूड, ऍक्रेलिक शिट सारख्या माध्यमात गरजे प्रमाने आकार वेगवेगळया प्रिन्ट माध्यमात कोरतो व कोरून तयार झालेल्या प्लेटपासून प्रिंट नघेता त्या प्लेट मध्ये वेगवेगळे रंग भरून ती वाळल्या नंतर इतर वस्तूंसोबत त्याची माडणी करतो.

हे सर्व कामे तो प्रिन्ट या संज्ञेखालीच तो करतो, तो म्हणतो केवळ कागदावर घेतलेला ठसा व त्याच्या प्रती म्हणजे माझ्यासाठी प्रिन्ट नाही,तर विशिष्ट साच्यांचा वापर करून वेगवेगळ्या माध्यमात निर्माण केलेल्या ऐका पेक्षा अधिक वस्तू सुध्दा माझ्यासाठी प्रिंटचेच एक स्वरूप आहे व त्यावर जे आकार मी कोरतो त्या करीता मी प्रिंटमेकिंग माध्यमात वापरण्यात येणाऱ्या टेक्निकचा वापर करतो, त्याचे असेच एक चित्र ज्याचे नाव श्पोकींग नोजश (Poking Noses) ह्या कलाकृती मध्ये पी. ओ. पी. (POP) माध्यमात एकसारख्या नाकाच्या काराचे पाच मोल्ड तयार केल्या आहेत. अशाच प्रकारे 'साऊड ऑफ गॉड' ह्या कामात कानाच्या दहा मोल्ड काढून व त्याला धातूचा तराजू लावण्यात आले आहे व त्या तराजून वर वेगवेगळया देशाचा नकाशा डिप ऐचिंग माध्यमात तयार करण्यात आला आहे. सचिनने याच संकल्पने खाली आजवर



*पोकींग नोजेस ; (Poking Noses), मिक्स मिडीयम प्रिंट, सचिन बोंडे*

बऱ्याच कलाकृती निर्माण केलेले आहे ज्यामध्ये तो विविध पद्धतीने विविध माध्यमांचा वापर प्रिंट मेकिंग या संकल्पने खाली करून आपले विचार मांडत असतो त्याच्या या सर्व कामांचा उल्लेख इथे करणे शक्य नाही परंतु त्याच्या या काम करण्याच्या पद्धतीवरून एक गोष्ट मात्र निश्चित सांगता येते की प्रिंटमेकिंग विषयातून कधी उत्तर पदवी प्राप्त झाल्यावर त्याने केवळ पारंपारिक पद्धतीने प्रिंटमेकिंग विषयात कामे केली नाही तर प्रिंटमेकिंग संकल्पने खाली विविध प्रयोगात्मक कामे त्याने केली आहे. व या आधारावर जगातच नाही  तर आंतरराष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख मिळवण्यामध्ये तो यशस्वी होत आहे.

चंद्रशेखर वाघमारे हा अजून एक नागपूर येथील कलाकार आहे जो प्रिंटमेकिंग माध्यमात काही प्रयोग करण्यामध्ये व्यस्त आहे. चंद्रशेखर वाघमारे यांचा जन्म १९८८ मध्ये नागपूर जिल्ह्यातील काटोल या गावी झाला. प्रारंभिक शिक्षण काटोल येथून पूर्ण केल्यावर तो कला शिक्षण घेण्याकरिता नागपूर येथील गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्ट अँड डिझाईन येथे आला व २०११ मध्ये येथून पेंटिंग विषयातून आपली पदवी पूर्ण केली त्यानंतर पदवी उत्तर पदवी घेण्याकरिता तो फॅकल्टी ऑफ फाईन आर्ट बडोदा येथे आला व २०१३ मध्ये प्रिंटमेकिंग विषयातून त्याने आपली पदवी पूर्ण केली. आज तो प्रिंटमेकिंग या विषयाला घेऊन संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामधून पीएचडी करीत आहे.

आपल्या प्रोफेशनल करिअरची सुरुवात त्याने प्रिंट मेकिंग क्षेत्रात काम करीत केली असली तरी त्याने  सोबतच कलाशिक्षक म्हणून सुद्धा काम सुरू केले. त्यांनी सुरुवातीला गुजरात येथील आनंदनगर CVM कॉलेज ऑफ फाईन आर्ट इथे अध्यापनाचे काम केले व त्यानंतर तो CISFA नागपूर येथे फाईन आर्ट कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना प्रिंट मेकिंग विषयाचे शिक्षण देऊ लागला व तो पुढे औरंगाबाद व नागपूर येथील शासकीय कला महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक म्हणून काम

करू लागला या व्यतिरिक्त "ऑरेंज ॲटेलियर इंडिया" नावाने स्वबळावर नागपूर येथे प्रिंट मेकिंग स्टुडिओ ची २०१५ मध्ये स्थापना केली. जिथे तो प्रिंटमेकिंग विषयामध्ये स्वतः प्रयोगात्मक काम तर करतच आहे.त्यासोबतच कार्यशाळेच्या माध्यमातून या विषयासंदर्भात विद्यार्थ्यांना पण जागृत करत आहे. आजवर चंद्रशेखर ने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक कला प्रदर्शनी मध्ये सहभाग तर घेतलाच आहे त्यासोबतच ललित कला अकॅडमी दिल्ली कडून दिला जाणारा राष्ट्रीय पुरस्कार सुद्धा त्याने मिळवला आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा त्याला पुरस्कार प्राप्त झाला आहे.

प्रिंटमेकिंग माध्यमांसोबत ज्याप्रमाणे तो आज प्रयोग करीत आहे याची सुरुवात खरंतर प्रिन्टमेकिंग माध्यमात शिक्षण घेत असतानाच झाली असल्याचे बघायला मिळते. त्यावेळी तो केवळ पारंपारिक माध्यमातच काम करीत नव्हता तर त्याच्या सोबतच काही, प्रयोगात्मक कामे पण तो करीत होता. अशेच त्याचे एक काम आहे ज्याचे नाव 'स्टोरी बिहाइंड स्टोरी' या कामामध्ये त्याने २ इंच जाडीचे अनेक वूड ब्लॉक चा वापर करून एक पुस्तक तयार केले ज्याच्या वरच्या भागाला ब्लॉकचा ज्याला आपण कवर म्हणू शकतो त्यावर अनेक वेगवेगळ्या स्टोरीच्या आधारावर काही चित्रे कोरून तयार केली ज्याचा विषय त्याच्या आजूबाजूला चालणाऱ्या राजकीय व सामाजीक घडामोडीच्या आधारावर होते. या करीता वेगवेगळया प्राण्याच्या आकाराचा पण त्याने वापर या स्टोरी चित्रामध्ये केला आहे. अशा प्रकारे कोरून तयार झालेल्या ब्लॉक वरून प्रिन्ट न काढता त्यावर वेगवेगळया रंगांच्या ल्याकरचा वापर करून हवा तसा परीनाम प्राप्त केला आहे व अशा प्रकारे तयार केलेले लाकडी ब्लॉक अस्ताव्यस्त अवस्थेत जमिनीच्या वर पडलेले त्यानी दाखवले आहे. तर त्या मधील काही ब्लॉक पुस्तकावर गधा ह्या प्राण्याचा चेहरा फायबर मोल्ड माध्यमात बनवून ठेवण्यात आले आहे व त्याच्या तोंडात काही भारतीय चलन म्हणून वापरण्यात येणाऱ्या नोटा दाखवल्या आहेत तर कधी तोंड लोखंडी चिमट्याने घट्ट दाबून बंद केलेले दाखविले आहे.




*स्टोरी बिहाइंड स्टोरी, वुडकट इन्स्टॉलेशन, चंद्रशेखर वाघमारे*

असेच अजून एक काम चंद्रशेखर वाघमारे याचे आहे ज्या मध्ये २x२ फूट आकाराच्या जाड लाकडी फ्रेमवर पूर्वनीयोजीत कल्पनेच्या आधारे काही आकार सी. एन. सी मशीनचा वापर करून कोरून. आतमधल्या भागात त्याच कल्पनेवर आधारीत आकृत्या लाकडी ब्लॉकवर स्वतःच कोरून तयार केली. त्या कोरलेल्या ब्लॉक व फ्रेम मध्ये रंग लावून त्याला सुकू दिले अशा ह्या पध्दतीने केलेल्या कलाकृती मध्ये प्रिन्टमेकिंग माध्यमात काम करण्यात येणाऱ्या पध्दतीचा वापर करून एक कलाकृती तयार केली आहे हे केवळ एक प्रिन्ट माध्यमात काम करणारा कलाकारच करू शकतो प्रिन्टमेकिंगच्या अनेक संभावना पैकी ही एक आहे असे म्हणता येईल.

दीपक सिनकर एक कला अध्यापक आहे जे सध्या स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ परफॉर्मिंग अँड विज्युअल आर्ट रोहतक येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे प्रामुख्याने विद्यार्थ्यांना प्रिंटमेकिंग या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात व त्यांना विविध माध्यमात काम करण्याची प्रेरणा देतात.दीपक सिनकर यांचा जन्म महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील वरुड या गावी ११ मे १९७६ ला झाला.शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर आपली कलेविषयक आवडत जोपासण्याकरिता ते नागपूर येथील गव्हर्नमेंट चित्रकला महाविद्यालय येथे आले व २००१ मध्ये येथून पेंटिंग विषयामध्ये पदवी प्राप्त केली व त्यानंतर पदव्युत्तर पदवी सर जे.जे.स्कूल ऑफ आर्ट महाविद्यालयातून २००३ मध्ये प्रिंटमेकिंग विषयातून प्राप्त केली पुढे त्यांनी नेट व पीएचडी सुद्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली त्यांनी आजवर विविध शासकीय गैर शासकीय कला शिक्षण संस्थानांमध्ये अध्यापनाचे कार्य केले आहे. त्यामध्ये गोखले एज्युकेशन सोसायटी नाशिक गव्हर्मेंट कॉलेज ऑफ आर्ट अँड डिझाईन औरंगाबाद त्याचप्रमाणे सर जे.जे.स्कूल ऑफ आर्ट मुंबई यांचा समावेश आहे.

या व्यतिरिक्त ते प्रिंट मेकर म्हणून सुद्धा कला क्षेत्रात आपले योगदान देत आहेत बॉम्बे सोसायटी सोबतच इतरही बऱ्याच महत्त्वपूर्ण कला संस्थानांकडून त्यांच्या कलेकरिता त्यांना पुरस्कृत करण्यात आलेले आहे. एकल प्रदर्शनी सोबतच अनेक सामूहिक कला प्रदर्शन मध्ये सुद्धा आजवर त्यांनी सहभाग घेतला आहे.

पारंपारिक प्रिंट माध्यमांसोबतच अपारंपारिक माध्यमांमध्ये सुद्धा विविध प्रयोग करतात.'इमेज आफ्टर ब्लास्ट'ही अशीच एक कलाकृती आहे,ज्यामध्ये सिनकर यांनी प्रिंट माध्यमाच्या विस्तृत संभावना प्रस्तुत केल्या आहेत. त्यात त्यांनी एखाद्या ठिकाणी बॉम्ब ब्लास्ट झाल्यावर जी मानवी जीवाची हानी होते,ते त्यांनी एक्स रे शीटच्या वापरातून दाखविले आहे.दीपक हे एक्स रे ला एक प्रिंट म्हणून बघतात.त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आज डिजिटल प्रिंटला ज्याप्रमाणे प्रिंटमेंकिंगचे एक माध्यम म्हणून स्वीकारल्या गेले आहे,त्याच प्रमाणे एक्स रे फिल्मसुद्धा एक प्रिंट आहे.'इमेज आफ्टर ब्लास्ट' या त्यांच्या प्रिंट इंस्टॉलेशन चित्रात त्यांनी मानवी शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांचा ज्यामध्ये हात,पाय,पाठ व मेंदू सारख्या भागाचे छोट्या एक्स–रे चे त्यांनी आपल्या कल्पनेप्रमाणे संयोजन केले व त्या मागे लाईटच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला असे करण्यामागे त्यांचा उद्देश हा एखाद्या बॉम्ब ब्लॉस्टनंतर जी मानवी जीवाची हानी होते ते दाखवणे होते.अजून एक प्रयोग दीपक यांनी त्यांच्या'होल पंच'मालिकेतसुद्धा केला.ज्यामध्ये धातूच्या पत्र्याचा वापर एम्बॉस छापा मिळवण्यासाठी केला आहे. एम्बॉस पद्धतीचा छापा पाहीजे त्या कल्पनेनुसार कागदावर मिळवल्या नंतर पूर्वनियोजीत भागावर ते पंचिंग मशीनसारख्या यंत्राचा वापर करून कागदाला छिंद्रे पाडल्या जाते.ही छिंद्रे त्याच्या प्रिंटचा एक भाग म्हणून ते करतात.अशा प्रकारे ते ४३ पेक्षा जास्त प्रमाणात प्रती मिळवतात.अशाच एम्बॉस माध्यमात केलेल्या काही प्रिंटमध्ये त्यांनी शिलाई (स्टिचींग)चा वापरसुद्धा केला आहे.अजूनही या माध्यमात नवनवीन संभावना शोधण्यात शिनकर व्यस्त आहेत.



*कनेक्टींग स्क्वेअर, एम्बॉसिंग अँड स्टीचिंग, दीपक सिनकर*



*होल पंच, एम्बॉसिंग अँड पंचिंग, दीपक सिनकर*

श्रीनिवास म्हेत्रे हा एक तरूण मुंबई मधील कलाकार आहे. तो नॉन टॉक्सीक माध्यमात विस्कोसिटी पद्धतीत काम करतो. आपल्याला माहीत आहे की, विस्कोसिटी पद्धतीत काम करण्यासाठी आम्लद्रव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागतो बऱ्याच वेळा,त्यामुळे शरीरावर विपरीत परिणाम होतांना दिसतात या कारणामुळे सुद्धा भारतात बरेच कमी कलाकार आहेत,जे या माध्यमात काम करतात. परंतु श्रीनिवास म्हेत्रे याने पारंपरिक पद्धतीचा वापर विस्कोसिटी प्रिंटमध्ये न करता त्याने प्लेटवर वेगवेगळ्या खोलीचे स्तर मिळवण्यासाठी बॅटरी किंवा इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या ड्रिल मशीनसारख्या अवजाराचा वापर केला आहे. या मशीनच्या वापरातून म्हेत्रे हवा तसा परिणाम प्लेटवर प्राप्त करतो व छापा घेण्यासाठी पृष्ठभाग तयार करतो. पारंपारिक व आधुनिक डिजिटल माध्यमाचा सुरेख मेळ हा मारिपली प्रवीण गाडे याच्या प्रिंटमध्ये दिसून येतो. तो प्रयोगात्मक पद्धतीच्या प्रिंट तयार करतो. त्याच्या प्रिंटचे विषय हे निसर्ग,टेक्नॉलॉजी,योग,ध्यानसारख्या विषयावर आधारित असतात. त्याच्या 'डिस्कवर लाईन टर्न अँज मॅप' व 'शेप फॉम ऑण्ड बॉण्ड्री' या मालिकेत त्याने दहापेक्षा अधिक प्रिंट तयार केल्या. त्यामध्ये सर्वप्रथम एका कागदाच्या तुकड्याला हाताने दाबून चोळामोळा केले. त्यानंतर त्याला पुन्हा सरळ केले सरळ केल्यावर त्यावर वेगवेगळ्या वळा उमटल्या. प्रवीणने विशिष्ट अंतरावर जे बिंदू कागदावर निर्माण झाले,त्यातून तयार झालेल्या रेषांमधून वेगवेगळे आकार कागदावर तयार झाले. त्याचा त्याने एक प्रकारचा कन्सच्युअल मॅप म्हणून उपयोग केला आहे. त्या कागदाला त्याने स्कॅनरच्या मदतीने फोटोशॉप सॉफ्टवेअरमध्ये नेऊन त्याला काळ्या व पांढऱ्या रेषांमध्ये ठळक करून घेतले. त्यांना एकत्र करून घेतले व त्या मिळालेल्या आकृतीला ऑफसेट प्रिटिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या ॲल्युमिनियमच्या प्लेटवर एक्सपोज केले. त्यानंतर फार जुन्या काळात काळ्या पांढऱ्या रंगात छपाई करण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या प्रेसचा वापर करून मॅन्युअल पद्धतीने छापाचित्रे तयार केले आहेत. त्याच्या अन्य कामात त्याने 'डिजिटल प्रिंट ॲण्ड इन्स्टॉलेशन' नावाखाली बरेच प्रयोगात्मक प्रिंट तयार केल्या आहे. अशीच एक त्यांची कलाकृती आहे 'माईन्ड फुलनेस ॲन्ड मॉडर्न कम्युनिकेशन' ज्यामध्ये त्यांचे क्यु आर स्कॅन कोडचा वापर करून आधुनिक मेडिटेशन सोबत त्याचा संबंध जोडला आहे.

**निष्कर्ष**

भारतीय कला विश्वात छापा कला ही भारतीय आधुनिक कलेला लाभलेली बहुमूल्य देन आहे. ज्याप्रमाणे भारतीय छापा कलेच्या सुरुवातीच्या विकासाच्या काळात छापा कलेला एक सशक्त माध्यम बनवण्यासाठी काही प्रमुख कलाकारांनी योग्य दिशेने व अथक परिश्रम घेऊन गती प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला, तोच प्रयत्न आज समकालीन तरुण छापा कलाकारांकडून होताना दिसत आहे. पारंपारिक ते कडून सुरू झालेला छापा कलेचा प्रवास आज आधुनिक छापा माध्यमातून पोहोचलेला आहे खरे तर आज भारतीय मुद्रण कला स्वअस्तित्व शोधण्यात यशस्वी होत आहे असे म्हणायला काही हरकत नाही. आज आंतरराष्ट्रीय स्तराप्रमाणेच भारतामध्ये सुद्धा अनेक तरुण कलाकारांच्या प्रयत्नांमुळे छापा कला प्रकार केवळ भिंतीवर  फ्रेम मध्ये लावण्यात येणारा एक चित्र या संक्षिप्त अर्थाच्या पलीकडे पोहोचली असून अनेक प्रयोगात्मक पद्धतीने ती भारतीय कलादालनांमध्ये प्रस्तुत होताना दिसत आहे. त्यामुळेच तर भारतीय तरुण छापा कलारककारांनी जागतिक कला जगताला आपली दखल घेण्यास भाग पाडले आहे.

**संदर्भ सूची**


भारतीय छापाचित्र कला आदी से आधुनिक काल तक, डॉ. सुनील कुमार, भरतीय कला प्रकाशक, दिल्ली, पृ. 111

https://artbaar.com/collections/dattatraya-apte

http://jnaf.org/artist/ravikumar-kashi/JEHANGIR NICHOLSON ART FOUNDATION,MUMBAI

https://www.thehindu.com/entertainment/art/pushing-the-frontiers/article29288777.ece

http://www.arcadja.com/auctions/en/balasubramaniam_alwar/artist/332334/

https://www.invaluable.com/auction-lot/untitled-94-c-aze5ufmhj2&https://www.youtube.com/watch?v=rAA8mMQi0is

https://www.dnaindia.com/lifestyle/report-artist-baiju-parthan-shows-the-impact-of-the-digital-world-on-our-life-in-his-latest-solo-exhibition-2623365

National Artist Camp-2001, Karnataka Chitrakala Parishath, Karnataka Chitrakala Parishath Trust

https://criticalcollective.in/ArtistInner.aspx?Aid=42

Paula Sengupta - Printmaker, Interview with Parul: Punjab Lalit Kala Akademi

https://www.youtube.com/watch?v=QeGLNgQWPFM,

https://criticalcollective.in/ArtistInner.aspx?Aid=42

https://www.nationalheraldindia.com/art/silence-is-a-powerful-enemy-of-social-justicePaula,Sengupta: Interview about The Printed Picture with Parul - Punjab Lalit Kala Akademi

सचिन बोंडे,चंद्रशेखर वाघमारे, दीपक शिनकर, श्रीनिवास म्हेत्रे, यांच्याशी प्रत्यक्ष घेतलेल्या मुलाखतीच्या आधाराव